**महाराष्ट्र शासन**
**जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, जि. रत्नागिरी (मु.)चिपळूण**
**यांचे कार्यालय**
**दुरध्वनी क्र.०२३५५-२५६१०७/पिनकोड नं -४१५६०५/ई-मेल आयडी**
**ddcahratnagiri@gmail.com**

**जा.क्र/जिपउआ/तांत्रिक/प्राणी क्लेष/** 2699 **/२०२४, चिपळूण,** **दिनांक** 29/11/2024

प्रति,
पशुधन विकास अधिकारी (विस्तार)
पंचायत समिती सर्व

**विषय:- प्राणी क्लेष प्रतिबंधक सोसायटी रत्नागिरी जिल्हा अशासकीय निवड करणेबाबत..**

संदर्भ:-१) अधिसूचना पदुम मु.३२ दि.१४ मार्च २०१७ ची अधिसूचना
२) जा.क्र.एसएलटी/कायदे/प्र.क्र.१३३/८४०/२०२६/प.सं.६, पुणे-६७ दि.१७.०५.२०२१
३) शासन निर्णय क्रमांक पविआ-१०१४/प्र.क्र.४६३/पदुम-३/मंत्रायल मुंबई-३२ दिनांक ०४.०७.२०१६
४) मा.जिल्हाधिकारी यांचेकडील मंजूर टिपण्णी दिनांक २८/११/२०२४

संदर्भ क्रमांक १ नुसार महाराष्ट्र शासनाच्या दिनांक १४.०३.२०१७ च्या अधिसूचना रत्नागिरी जिल्ह्यामध्ये प्राणी क्लेष सोसायटीची स्थापना झाली असून समितीमध्ये अशासकीय सदस्यांची निवड करण्यात आली होती. परंतु अशासकीय सदस्यांची नियुक्तीची मुदत संपली असल्याने संदर्भ क्रमांक ३ च्या शासन निर्णयानुसार समितीमध्ये अशासकीय सदस्यांची पुनर्नियुक्ती करण्यासाठी पंचायत समिती स्तरावर अर्ज व अधिसूचना उपलब्ध करुन इच्छुक सदस्यांचे दिनांक १५/१२/२०२४ अखेरपर्यंतचे अर्ज आपले मार्फत या कार्यालयास शिफारशीसह सादर करण्यात यावेत.

सोबत अर्जाचा नमुना व अधिसूचनेची प्रत देण्यात येत आहे.
खालील निकषांची पुर्तता करणारी व्यक्ती अर्ज करुन शकते. खालील संदर्भानुसार त्या त्या गटाचे अर्ज स्वीकारावेत.

१. सदरची व्यक्ती संबंधीत जिल्ह्यातील गोशाळा/पांजरपोळ संस्थांपैकी एका संस्थेला अध्यक्ष असावी.

२. प्राणी कल्याण विषयक कार्य करणाऱ्या सेवाभावी संस्थेचे प्रतिनिधी

३. सर्वसाधारण समितीने नामनिर्देशित केलेल्या दोन व्यक्ती

४. संबंधीत जिल्ह्यातील मानवहितकारक कार्य करणारे/प्राण्यांवर प्रेम करणारे/प्राणी कल्याणासाठी काम करणारे पाच ते सहा कार्यकर्ते

(डॉ.डी.एस.सोनावले)
जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त/ तथा सदस्य सचिव
सोसायटी फॉर प्रिव्हेशन ऑफ क्रुएल्टी टू ॲनिमेल्स (एसपीसीए)
(जिल्हास्तरीय प्राणी क्लेश प्रतिबंधक समिती)
जि.रत्नागिरी, मु.चिपळूण

सोबत : अर्जाचा नमुना

Mahabharti.in

## जिल्हास्तरीय प्राणी क्लेश प्रतिबंधक समितवर अशासकिय सदस्य नियुक्तीसाठी अर्जाचा नमूना

* मांस/चर्मउद्योगाशी संबधित व्यक्ती/प्राणीकल्याण विषयक योजना राबविणारी संस्था प्रतिनिधी/पांजरपोळ संस्था अध्यक्ष/प्राणी कल्याणासाठी झटणा-या व्यक्ती.

(* लागु नसेल ते खोडावे)

अर्जदाराचा फोटो

| | | |
|---|---|---|
| १ | अर्जदाराचे पुर्ण नांव | |
| २ | पुर्ण पत्ता | |
| ३ | फोन नंबर | |
| ४ | व्यवसाय | |
| ५ | वरील * या ठिकाणी ज्या सदस्यत्वासाठी अर्ज केला आहे.त्या बाबतची थोडक्यात माहीती | |

माझी जिल्हास्तरीय प्राणी क्लेश प्रतिबंधक समिती रत्नागिरी या समितीवर नियुक्ती झाल्यास मी समितीच्या वेळोवेळी होणा-या बैठकींना उपस्थित राहीन. प्राणिक्लेश प्रतिबंधक कायदा अंमलबजावणीसाठी उचीत सहाकार्य करेन. तरी माझी नियुक्ती होण्यास विनंती आहे.

अर्जदाराची सही

मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा प्राणी क्लेश प्रतिबंधक समिती रत्नागिरी यांना मंजूरीसाठी सादर.

अर्जासोबत खाली कागदपत्रे सादर करावीत.

१) अर्जदाराचे ओळखपत्र.सत्यप्रत २) संस्थेचे नोंदणी पत्र सत्यप्रत. ३) शैक्षणिक पात्रता ४) रहिवासी दाखला